RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ९, अंक ७९] मंगळवार, जुलै २५, २०२३/श्रावण ३, शके १९४५ [पृष्ठे ७, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १६३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### ग्रामविकास विभाग

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट,
मुंबई ४०० ००१, दिनांक २१ जुलै, २०२३

**अधिसूचना**

**महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१.**

क्रमांक सेप्रनि-२०१८/प्र.क्र.१६२/आस्था-७.— महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ५) याच्या कलम २७४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (३९) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम, १९६७ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य नियम" असा केला आहे) महाराष्ट्र शासनाने सुधारणा करण्याचे प्रस्तावित केलेल्या नियमांचे पुढील प्रारूप, त्यामुळे बाधा पोहोचण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीकरिता उक्त अधिनियमाच्या कलम २७४ च्या पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येत आहे की, उक्त प्रारुप, महाराष्ट्र शासनाकडून दिनांक २१ ऑगस्ट, २०२३ रोजी किंवा त्यानंतर विचारात घेण्यात येईल.

२. उपरोक्त दिनांकापूर्वी, उक्त मसुद्याच्या बाबतीत कोणत्याही व्यक्तीकडून प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४०० ००१ यांच्याकडे ज्या कोणत्याही हरकती किंवा सूचना प्राप्त होतील त्या शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

**प्रारूप नियम**

क्रमांक सेप्रनि-२०१८/प्र.क्र.१६२/आस्था-७.— महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ५) याच्या कलम २७४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (३९) द्वारे प्रदान केलेले अधिकारांचा आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, आणि सेप्रनि-२०१८/प्र.क्र.१६२/आस्था-७, दिनांक २७ एप्रिल, २०२३ ची अधिसूचना

अधिक्रमित करून महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा (सेवाप्रवेश) नियम, १९६७ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे, सदर नियम,उक्त कलम २७४ च्या पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, यापूर्वीच प्रसिद्ध करण्यात आले आहेत :—

**१.** (१) या नियमांस, महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) (**सुधारणा) नियम, २०२३ असे म्हणावे.

**२.** महाराष्ट्र जिल्हा परिषद सेवा (सेवाप्रवेश) नियम, १९६७ याच्या,परिशिष्ट नऊ मधील,—

(क) "जिल्हा सेवा (वर्ग ३) (दुय्यम मंत्रालयीन) वर्ग एक", याच्याशी संबंधित असणाऱ्या अनुक्रमांक ५ येथील नोंदीमधील स्तंभ ३ मधील "पद" या शीर्षाखालील, कनिष्ठ सहायक, याच्याशी संबंधित असणाऱ्या अनुक्रमांक (एक) स्तंभ ४ मधील, "(एक) कनिष्ठ सहायक" याच्याशी संबंधित असणाऱ्या "अर्हता व नियुक्ती पद्धती" या शीर्षाखाली, " १. एकतर नियुक्ती करण्यात येईल -", या खंडापूर्वी पुढील खंड ज्यादा दाखल करण्यात येईल :—

"**अ१.** कनिष्ठ सहायक पदावरील नियुक्ती, एकतर,—

(क) पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या आणि त्या पदावर तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी नियमित सेवा असणाऱ्या गट-ड मधील पद धारण करणाऱ्या व्यक्तींमधून, पात्रतेच्या अधीन राहून, ज्येष्ठतेच्या आधारे, योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने करण्यात येईल, आणि जिने,—

(एक) कोणत्याही मान्यताप्राप्त सांविधिक विद्यापीठातून कोणत्याही शाखेतील पदवी धारण केलेली आहे; आणि

(दोन) किमान ३० शब्द प्रति मिनिट इतक्या वेग मर्यादेचे मराठी टंकलेखनाचे किंवा ४० शब्द प्रति मिनिट इतक्या वेग मर्यादेचे इंग्रजी टंकलेखनाचे शासकीय वाणिज्यिक प्रमाणपत्र **किंवा** संगणक टंकलेखन प्रमाणपत्र धारण केलेले आहे;

**किंवा**

(ख) ज्यांची निवड मंडळाने घेतलेल्या स्पर्धा परीक्षांद्वारे निवड केली आहे आणि सर्वसाधारण प्रवर्गातील व्यक्तींच्या बाबतीत, ज्यांचे वय एकोणीस वर्षांपेक्षा कमी नाही आणि अडतीस वर्षांपेक्षा अधिक नाही आणि मागास प्रवर्गातील व्यक्तींच्या बाबतीत ज्यांचे वय एकोणीस वर्षांपेक्षा कमी नाही आणि त्रेचाळीस वर्षांपेक्षा अधिक नाही आणि तसेच ज्या वरील खंड (क) च्या उप-खंड (एक) व किमान ३० शब्द प्रती मिनिट इतक्या वेगमर्यादेचे मराठी टंकलेखनाचे व ४० शब्द प्रति मिनिट इतक्या वेगमर्यादेचे इंग्रजी टंकलेखनाचे शासकीय वाणिज्यिक प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखन प्रमाणपत्र धारण केलेले आहे अशा व्यक्तींमधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल ;

**किंवा**

(ग) शासनाने, याबाबतीत, वेळोवेळी काढलेल्या आदेशानुसार अनुकंपा तत्त्वारील आणि जिने वरील खंड (क) च्या उप खंड (एक) व (दोन) मध्ये विनिर्दिष्ट केलेली अर्हता धारण केलेली आहे अशा योग्य व्यक्तीच्या नियुक्तीद्वारे करण्यात येईल;

**किंवा**

(घ) वाहन चालक, गट क पदावर तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या, ज्यांनी कनिष्ठ सहायक पदास पसंती दर्शवली आहे आणि खंड (क) च्या उप खंड (एक) व (दोन) मध्ये नमूद केलेली अर्हता धारण केलेली आहे अशा वाहन चालक, गट क हे पद धारण करणाऱ्या व्यक्तींमधील स्थायी संवर्गातील

योग्य व्यक्तीच्या बदलीद्वारे पात्रतेस अधीन राहून, ज्येष्ठतेच्या आधारे नियुक्ती करण्यात येईल. वाहन चालकांची कनिष्ठ सहायक पदावरील ज्येष्ठता, कनिष्ठ सहायक पदावर नियुक्ती केल्यानंतर, रुजू झाल्याच्या दिनांकापासून निश्चित करण्यात येईलः

परंतु,—

(१) खंड (क) च्या उप-खंड (दोन) मध्ये नमूद केलेली अर्हता धारण करीत नाही अशा माजी सैनिकांमधील पात्र असणाऱ्या उमेदवारास, अशी व्यक्ती,तिच्या नियुक्तीच्या दिनांकपासून अकरा महिन्याच्या कालावधीत, सदर अर्हता संपादित करील या शर्तीस अधीन राहून, या पदाच्या स्पर्धा परीक्षेस बसण्यासाठी मुभा देण्यात येईल.

(२) जर अनुकंपा तत्त्वावर नियुक्त केलेला उमेदवार, शासनाने वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत, खंड (क) च्या उप खंड (दोन) मध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता धारण करण्यास निष्फळ ठरला असेल तर, शासनाने याबाबतीत वेळोवेळी काढलेल्या आदेशानुसार कारवाई करण्यात येईल;

(३) ज्या उमेदवारांची नावे, अनुकंपा तत्त्वावरील नियुक्तीसाठी प्रतीक्षा सूचीमध्ये समाविष्ट आहेत, अशा उमेदवारांना, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र ही शैक्षणिक अर्हता लागू असेल. हे नियम प्रसिद्ध केल्याच्या दिनांकास ज्या उमेदवारांची नावे अनुकंपा तत्त्वावरील नियुक्तीसाठी प्रतीक्षासूचीमध्ये समाविष्ट नाहीत, असे उमेदवार, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्रासह खंड (क) च्या उप खंड (एक) मध्ये नमूद केलेली अर्हता धारण करतील;

(४) जे उमेदवार गट ड, वाहनचालकाचे पद धारण करीत आहेत व ज्यांनी माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केली आहे आणि हे नियम प्रसिद्ध केल्यावर किंवा त्यापूर्वी खंड (क) च्या उप खंड (दोन) मध्ये नमूद केलेली अर्हता धारण केली आहे अशा उमेदवारांचा देखील, हे नियम प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून पुढील पाच वर्षांसाठी वरील खंड (क) अन्वये पदोन्नतीकरिता विचार करण्यात येईल;

(५) खंड (ख)मध्ये नमूद केलेली उच्च वयोमर्यादा,अनुकंपा तत्त्वावर किंवा पसंतीच्या आधारावर,उदा. पदवीधर (अंशकालिन) नियुक्त केलेल्या व्यक्तींना, आणि मागासवर्गाकरिता आरक्षित आहेत अशा वर्गातील व्यक्तींना आणि समांतर आरक्षण असलेल्या उदा. माजी सैनिक, दिव्यांग, प्रकल्पग्रस्त व्यक्ती, भूकंपग्रस्त व्यक्ती व खेळाडू यांना लागू असणार नाही. अशा प्रवर्गातील उमेदवारांसाठी उच्च वयोमर्यादा ही, याबाबतीत शासनाने वेळोवेळी घोषित केलेल्या प्रचलित धोरणानुसार असेल.

**अ२.** वरील १ मध्ये नमूद केलेल्या पदावरील नियुक्ती ही, पदोन्नतीने, अनुकंपा तत्त्वावरील नियुक्तीसह नामनिर्देशनाने आणि वाहनचालक संवर्गामधील कायमस्वरूपी बदलीने अनुक्रमे ४०:५०:१० या प्रमाणात करण्यात येईलः

परंतु, जर पदोन्नतीसाठी किंवा चालक संवर्गातून कायमस्वरूपी बदलीद्वारे नमूद केलेली अर्हता धारण करणारे योग्य उमेदवार उपलब्ध झाले नाही तर, नियुक्ती प्राधिकाऱ्यास, पदोन्नतीद्वारे व वाहनचालक संवर्गातून कायमस्वरूपी बदलीद्वारे नियुक्तीकरिता सदर प्रमाण शिथील करता येईल आणि नामनिर्देशनाद्वारे उमेदवाराची नियुक्ती करता येईल.

**अ३.** नियम १ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्ती केलेल्या व्यक्तीने,अगोदरच विभागीय परीक्षा उत्तीर्ण केली नसेल किंवा ती परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट देण्यात आली नसेल तर, जेथे लागू असेल तेथे ,त्या बाबतीत केलेल्या नियमांनुसार ती परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असेल.

**अ४.** नियम १ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीने, हिंदी व मराठी भाषा परीक्षा आगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात आली नसेल तर,त्याबाबतीत केलेल्या नियमानुसार त्या परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असेल.तसेच,जर हिंदी व मराठी भाषा परीक्षा विहित मुदतीच्या आत, उत्तीर्ण केल्या नसतील तर, तिला या परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय असणार नाही आणि वरिष्ठ पदावरील पदोन्नती देण्यात येणार नाही.

**अ५.** नियम १ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त केलेली व्यक्ती, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, महाराष्ट्र शासन, यांनी वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणी प्रमाणपत्र धारण करील. जर विहित कालावधीत प्रमाणपत्र धारण केले नाही तर,तिला,संगणक हाताळणी प्रमाणपत्र धारण करीपर्यंत वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय असणार नाही आणि वरिष्ठ पदावरील पदोन्नती देता येणार नाही.

**अ६.** नियम १ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्तीसाठी शिफारस केलेल्या व्यक्तींनी महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंब घोषणा) नियम, २००५ मधील तरतुदींनुसार लहान कुटूंबाची घोषणा किंवा शासनाकडून, वेळोवेळी इतर कोणतेही नियम, आदेश किंवा या संदर्भात जारी केलेल्या कोणत्याही साधनांनुसार एक घोषणा सादर करावी लागेल.

(२) लहान कुटूंबाची घोषणा सादर केलेल्या तारखेला दोनपेक्षा जास्त मुले असलेली व्यक्ती या नियमांनुसार नियुक्त केलेल्या सेवेत नियुक्तीसाठी अपात्र ठरेल.

(३) या नियमानुसार नियुक्त केलेल्या एखाद्या व्यक्तीची नियुक्ती झाल्यानंतर, नियुक्तीच्या वेळी किंवा त्यांनतर त्याला दोनपेक्षा जास्त अपत्ये असल्याचे सिद्ध झाल्यास, ती या पदावर सेवा चालू ठेवण्यासाठी अपात्र ठरेल.

**अ७.** कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याच्या नियुक्तीनंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले कोणतेही नियम, आदेश किंवा निर्णय यांमध्ये शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या अटी व शर्ती देखील, या नियमांन्वये नियुक्ती केलेल्या शासकीय कर्मचाऱ्यास लागू असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**एकनाथ डवले,**
शासनाचे प्रधान सचिव.

क्रमांक सेप्रनि-२०१८/प्र.क्र.१६२/आस्था-७
**ग्रामविकास विभाग,**
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई ४०० ००१,
दिनांक २१ जुलै, २०२३.

(१) मा. राज्यपाल यांचे सचिव

(२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

(३) मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव

(४) मा. विरोधी पक्ष नेते विधानसभा/विधान परिषद यांचे खाजगी सचिव

(५) मा.मंत्री ( ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव

(६) सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव

(७) मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई

(८) अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई

(९) प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई

(१०) प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई

(११) प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई

(१२) सर्व विभागीय आयुक्त

(१३) सर्व जिल्हाधिकारी

(१४) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी

(१५) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

(१६) सर्व उपायुक्त (विकास/आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालये

(१७) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई

(१८) सर्व सह/उप सचिव, अवर सचिव, कार्यासन अधिकारी, ग्रामविकास विभाग

(१९) निवडनस्ती, कार्यासन आस्था -७

**RURAL DEVELOPMENT DEPARTMENT**

Bandhkam Bhavan, 25, Marzban Road, Fort,
Mumbai 400 001, Dated 21st July 2023

*NOTIFICATION*

The Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961.

No.SEPRANI-2018/C.R.162/Est.-7.— The following draft of rules further to amend the Maharashtra Zilla Parishads District Services (Recruitment) Rules, 1967 (hereinafter referred to as "the principal Rules"), which the Government of Maharashtra proposes to make in exercise of the powers conferred by clause (xxxix) of sub-section (*2*) of section 274 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (Mah. V of 1962), and of all other powers enabling it in that behalf is hearby published, as required by sub-section (*3*) of section 274 of the said Act, for the information of all the persons likely to be affected thereby; and a notice is hereby given that the said draft rules will be taken in to consideration by the Government of Maharashtra on or after the 21st August of 2023.

2. Any objection or suggestions, which may be received by the Principal Secretary, Rural Development Department, Bandhkam Bhavan, 25, Marzban Road, Fort, Mumbai 400 001, from any person with respect to the said draft before the aforesaid date, will be considered by the Government.

*DRAFT RULES*

No.SEPRANI-2018/C.R. 162/Est.-7.— In exercise of the powers conferred by clause (xxxix) of sub-section (*2*) of section 274 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (Mah. V of 1962), and of all other powers enabling it in that behalf, and in supersession of Government notification Rural Development Department No.SEPRANI-2018/C.R. 162/Est.-7,dated 27th April, 2023 issued in this behalf, the Government of Maharashtra hereby, makes the following rules, further to amend the Maharashtra Zilla Parishads District Services (Recruitment) Rules, 1967, the same have been previously published as required by sub-section (*3*) of the said section 274, namely :—

**1.** (*1*) These rules may be called the Maharashtra Zilla Parishads District Services (Recruitment) (**Amendment) Rules, 2023.

**2.** In the Maharashtra Zilla Parishads District Service (Recruitment) Rules, 1967, in Appendix IX appended thereto,—

*(a)* in entry at serial No. 5, relating to "District Service (Class III)(Subordinate Ministerial) Grade I", in column 3, under the heading "Post", against the serial No. (i), relating to 'Junior Assistant', in column 4, under the heading "Qualifications for and methods of appointment", against "(i) Junior Assistant", before clause "1. Appointment shall be made either-", the following clause shall be added, namely :—

**"A1.** The appointment to the post of Junior Assistant, shall be made either,—

*(a)* by promotion of suitable person, on the basis of seniority subject to fitness from amongst the persons holding the post in Group D having not less than three years of regular services on that post, and who,—

(*i*) possess a degree in any branch from any recognised statutory university; and

(*ii*) possess the Government Commercial Certificate or Computer Typing Certificate with a speed of not less than 30 words per minute for Marathi Typewriting **or** 40 words per minute for English Typewriting;

**OR**

(*b*) by nomination from amongst the persons, who were selected by competitive examination conducted by the Selection Board, and who are not less than nineteen years of age and not more than Thirty-eight years of age in case of persons belonging to General Class and not more than forty- three years of age in case of persons belonging to Backward Class and also who possess qualifications specified in sub-clauses (i) of clause (a) above and also who possess the the Government Commercial Certificate or Computer Typing Certificate with a speed of not less than 30 words per minute for Marathi Typewriting and 40 words per minute for English Typewriting;

**OR**

(*c*) by appointment of a suitable person on compassionate ground, in accordance with the orders issued by the Government in this behalf, from time to time, and also who possess qualifications specified in sub-clauses (i) and (ii) of clause (a) above;

**OR**

(*d*) by transfer of a suitable person from permanent cadre amongst the persons holding the post of Driver, Group C, who prefer the post of Junior Assistant, having completed not less than three years of regular service on the post of Driver and possessing qualifications mentioned in sub-clauses (i) and (ii) of clause (a), on the basis of seniority subject to fitness. The seniority of Drivers on the post of Junior Assistant shall be fixed from the date of joining after appointment to the post of Junior Assistant:

Provided that,—

(*1*) the candidate eligible to appear from the ex-serviceman, who does not possess the qualification mentioned in sub-clause (ii) of clause (a), shall be allowed to appear for the competitive examination for this post, subject to the condition that, such a person shall acquire the qualification within the period of eleven months from the date of his appointment;

(*2*) if a candidate appointed on compassionate ground fails to possess the qualification mentioned in sub-clause (ii) of clause (a), within the period specified by the Government, from time to time, then the action shall be taken as per the orders issued by the Government, from time to time in this regard;

(*3*) for the appointment of candidates whose names are included in the waiting list for appointment on compassionate ground, the educational qualification of Secondary School Certificate shall be applicable. The candidates whose names are not included in the waiting list for appointments on compassionate grounds on the date of publication of these rules, shall possess the qualifications mentioned in sub-clause (i) of clause (a) alongwith Secondary School Certificate;

(*4*) the candidates who are holding the post of Driver, in Group D and who have passed the Secondary School Certificate Examination and possess qualifications mentioned in sub-clauses (ii) of clause (a), on or before publication of these rules, shall also be considered for promotion under the clause (a) above, for next five years from the date of publication of these rules;

(*5*) the upper age limit mentioned in clause (b) shall not be applicable to the persons appointed on compassionate ground or on preference basis such as Graduate (part time) and persons belongs to such classes, which reserved

for other backward class and horizontal reservation such as ex-servicemen, differently abled persons, project affected persons, earthquake affected persons and sports person. Upper age limit for the candidates belonging to such classes shall be as per the prevalent policy declared by the Government in this regard, from time to time.

**A2.** Appointment to the post mentioned in 1 above shall be made by promotion, nomination including the appointment on the compassionate ground and permanent transfer from Driver cadre, in the ratio of 40:50:10 respectively:

Provided that, if suitable candidates possessing qualification mentioned for promotion or by permanent transfer from Driver cadre are not available, then the Appointing Authority may relax the ratios for appointment by promotion and by permanent transfer from Driver cadre and may appoint the candidates by nomination.

**A3.** A person appointed to the post mentioned in rule 1 shall be required to pass the departmental examination, wherever applicable, according to the rules made in that behalf, unless he has already passed, or has been exempted from passing the examinations.

**A4.** A person appointed to the post mentioned in rule 1 shall be required to pass examinations in Hindi and Marathi languages according to the rules made in that behalf, unless he has already passed, or has been exempted from passing those examinations. Similarly, if Hindi and Marathi language examinations are not passed within the prescribed time, the annual increment will not be admissible and promotion to senior position will not be allowed till the examination is passed.

**A5.** A person appointed to the post mentioned in rule 1 shall possess a certificate in Computer Operation as prescribed by the Directorate of information Technology, Government of Maharashtra from time to time. If the certificate is not held within the prescribed time, the annual increment will not be permissible and promotion to the senior post will not be permissible till he will holds the computer operation certificate.

**A6.** A person recommended for appointment by nomination to the post mentioned in rule 1 shall submit a declaration of Small Family as per the provisions of the Maharashtra Civil Services (Small Family Declaration) Rules, 2005 or any other rules, orders or any instruments issued in this behalf by the Government, from time to time.

(2) A person having more than two children on the date of submission of Declaration of Small Family shall be disqualified for the appointment in the service appointed under these rules.

(3) After appointment of a person in the service appointed under these rules, if it is proved that he has more than two children at the time of appointment or thereafter, then he shall be disqualified for continuing on the said post.

**A7.** The terms and conditions specified by the Government, subsequent to the appointment of any Government Servant in any rules, orders or resolutions issued by the Government, from time to time, shall also be applicable to the Government Servant appointed under these rules."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

EKNATH DAWALE,
Principal Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

No. No.SEPRANI-2018/C.R. 162/Est.-7
**RURAL DEVELOPMENT DEPARTMENT,**
Bandhkam Bhavan, 25, Marzban Road,
Fort, Mumbai 400 001,
dated 21st July, 2023.

To,

1. The Secretary to the Governor, Raj Bhavan, Malbar Hill, Mumbai
2. The Principal Secretary to the Chief Minister
3. The Secretary to the Deputy Chief Minister
4. The Opposition leader Legislative Assembly / Legislative Council
5. The Secretary to the Rural Development Minister
6. The Secretary to All Ministers and State Ministers
7. The personal assistant to the chief Secretary
8. All Additional Chief Secretary/Principal Secretary/Secretary of Mantralay Department
9. The Registrar, High Court (Original Side), Bombay
10. The Registrar, High Court (Appellate Side), Bombay
11. The Registrar, Office of the Lok Ayukta and Upa-Lok Ayukta, Mumbai
12. All Divisional Commissioners
13. All Collectors
14. All Chief Executive Officers of Zilla Parishads
15. All District Treasury Officers
16. All Deputy Commissioners (Establishment), Divisional Commissioners Office
17. Directorate of Information and public relations
18. All Joint/Deputy Secretary, Rural Development Department.
19. Select File-EST-7